# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 06 November 2024
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: ०६ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

जल व्यवस्थापन, संवर्धन आणि शाश्वतता याबाबत जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी केंद्र शासनातर्फे आजपासून पंधरा दिवसांचा जल उत्सव साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय जल जीवन मिशन, पेयजल आणि स्वच्छता विभाग आणि जल शक्ती मंत्रालयाच्या सहकार्याने ही मोहिम राबवण्यात येत आहे. वीस राज्यांमध्ये राबवण्यात येणाऱ्या या मोहिमेत जलस्रोतांचे संवर्धन आणि संरक्षण यासाठी नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्यावर भर देण्यात येणार आहे. पाण्याचा वापर आणि पाणी व्यवस्थापन सक्षम करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे.

****

भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपनं राज्यभरातील आपल्या चाळीस पदाधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. पक्षशिस्त आणि अनुशासन भंग केल्यामुळे ही कारवाई करण्यात येत असल्याचं पक्षानं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

****

अलिबाग-मुरुड मतदारसंघाचे भाजपचे पदाधिकारी दिलीप भोईर यांचं पक्षातून सहा वर्षासाठी निलंबन करण्यात आलं आहे. महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्याविरुद्ध त्यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यानं निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचं भाजप खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितलं.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या पक्षातील पाच नेत्यांवर पक्षविरोधी कारवाया केल्यानं निलंबनाची कारवाई केली.

यात माजी आमदार रुपेश म्हात्रे, विश्वास नांदेकर, चंद्रकांत घुगूल, संजय आवारी आणि प्रसाद ठाकरे यांचा समावेश आहे.

****

नांदेड जिल्ह्यात भोकर इथं स्वीपअंतर्गत तृतीयपंथी मतदारांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या उपक्रमात मतदारांनी मतदान करण्याची शपथ घेतली आणि मतदानासाठी स्वाक्षरी मोहीम तसेच सेल्फी काढून या उपक्रमात सहभाग नोंदवला.

****

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथले कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते विधिज्ञ अनंतराव जगतकर यांनी कॉँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. ते काल बीड इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. जिल्ह्यातल्या कॉँग्रेस पक्षाच्या नेतृत्वासाठी वरिष्ठ नेत्यांकडे पाठपुरावा करूनही उमेदवारी न मिळाल्यानं पक्षाचा राजीनामा देत असल्याचं जगतकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केलं.

****

धाराशिव तालुक्यातल्या तेर इथंल्या श्री संत गोरोबा काका कुंभार यांची पालखी काल कार्तिकी एकादशी निमित्त पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक संजय कुलकर्णी यांनी या पालखीचं धाराशिव शहरात स्वागत केलं.

****

परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांच्या हस्ते जिल्हा परिषद परिसरात काल वृक्षारोपण करण्यात आलं. जिल्हा परिषद परिसर सुशोभीकरण करण्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाच्या वतीनं हा वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी परिसरात करंज, गुलमोहोर, अशोक, जांभूळ, कदंब अशा विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

****

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील चार मतदारसंघांची सन १९८५ ते २०१९ या वर्षांतील पूर्वपीठिका- माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचं प्रकाशन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते काल झालं. या पुस्तिकेत जिल्ह्यातल्या सर्व विधानसभा मतदारसंघात पार पडलेल्या निवडणूकांची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली आहे.

****

कोल्हापूर शहरात मतदान जनजागृतीसाठी काल सायकल रॅली काढण्यात आली. लोकसभेच्या निवडणुकीप्रमाणे पुन्हा एकदा उच्चांकी मतदान करावं असं आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी यावेळी केलं. या रॅलीत दीडशे सायकलस्वार सहभागी झाले होते. मतदारांनी यावेळी मतदान करण्याची शपथ घेतली.

****

संभाजी ब्रिगेड पक्षाद्वारे विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत दोन उमेदवारांसह राज्यात २५ उमेदवार असल्याची माहिती आज संभाजी ब्रिगेडचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सुहास राणे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघातल्या वार्ताहर परिषदेत दिली. पक्षाद्वारे मुंबई, ठाणे, पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर, नांदेड, जालना, बीड, धाराशिव, यवतमाळ, बुलढाणा, चंद्रपूर, नाशिक, सांगली जिल्ह्यातून उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात काल पोलिसांनी कारवाई करत १५ हजार रूपयांचे प्रतिबंधित अमली पदार्थ जप्त केले. सुरत इथून खाजगी वाहनाद्वारे अमली पदार्थ आणले जात असल्याच्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात नशेच्या गोळ्या तसंच औषध आणि शस्त्रांचा समावेश आहे.

****

मराठी रंगभूमी दिनानिमित्त काल अखिल महाराष्ट्र विद्यामंदिर समितीच्यावतीनं दिलं जाणारं विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांना प्रदान करण्यात आलं. सांगली इथं विष्णुदास भावे नाट्यगृहात शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉक्टर जब्बार पटेल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, शाल आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****